# Block 1 • Session 3
## 'गाढवाची गोष्ट' शिक्षकांसाठी टिपण

1. लक्ष केंद्रित करणेचा सराव घ्या. मुलांना त्यांना -त्यांच्या मनात काय चाललं आहे हे विचारा. उदाहरणार्थ, ते स्वप्नरंजन किंवा दिवास्वप्न पाहात होते का ! किंवा ते बरेचसे लक्ष केंद्रित करण्यास सक्षम होते. (हे ओळखण्यासाठी बारकाईने लक्ष ठेवावे लागते) ज्यांनी लक्षपूर्वक लक्ष दिले होते त्यांची स्तुती करा.

2. गेल्या आठवड्यातील विचाराचा आढावा घ्या. त्या बाबत मुलं आणखी काही विचार किंवा दाखले देताहेत का ते पहा.

3. गाढवाची सावली ही गोष्ट वाचून दाखवा.

4. मुलांना गोष्टीत घडलेल्या तीन घटना पण उलट्या क्रमाने आठवायला सांगा. यासाठी थोडा वेळ दिल्यानंतर त्यांना बाजूच्या मुलाबरोबर चर्चा करायला सांगा.

5. मुलांना गोष्टीतील त्यांना आवडलेले विचार, संकल्पना याबद्दल विचार करायला सांगा. त्यांच्या उत्तरातून फळ्यावर शब्दांचे जाळे तयार करा. मुलांना तुम्ही सुचवू नका पण उदाहरणार्थः लोभ, स्वार्थ, मालकी इ.

6. संवाद साधण्यासाठी, विचार करण्यासाठी दिलेल्या प्रश्नांची चर्चा करा.

7. पाठ संपवताना आधी लिहिलेल्या शब्दांच्या जाळ्याचा अभ्यास करा. संवादानंतर आलेल्या कल्पनांचे पुन्हा निरीक्षण करा आणि त्या कशा निर्माण झाल्या / समोर आल्या ह्याचा अभ्यास करा..

8. "आठवड्याचा विचार "ह्यावर चर्चा करा.

# गाढवाची गोष्ट

## इसापची दंतकथा

जुन्या काळातील गोष्ट आहे .तेंव्हा प्रवास करणे खूप कठीण होते .एका प्रवाश्याला खूप अंतराचा प्रवास करायचा होता आणि त्यासाठी त्याने एक गाढव भाडे तत्वावर घेतले आणि त्या गाढवावर आपले सर्व समान लादले आणि स्वतः देखील त्यावर बसून प्रवास सुरु केला आणि गाढवाचा मालक त्या गाढवासोबत चालत होता.

अत्यंत दगड-धोंड्याच्या रस्त्याने प्रवास करून, जंगल तुडवून आता त्यांना एका लांबच्या टेकडीकडे जायचे होते .तिथे जाताना वाटेत कुठेच सावली किंवा निवारा नव्हता .

तो एक छान दिवस होता आणि जस-जशी दुपार होऊ लागली तस-तसे ऊन वाढू लागले .प्रवाश्याने डोक्यावर टोपी घातली होती तरीही त्याला खूप गरम होत होते आणि घाम येत होता .त्याला आता कुठेतरी थांबून काहीतरी प्यावेसे वाटू लागले“ .जर छान थंड पाणी मिळाले तर किती छान होईल”.

“मला काही वेळ आराम करून, पाणी प्यायचे आहे ”.तो गाढवाच्या मालकाला म्हणाला .गाढवाच्या मालकास अश्या प्रवासाची आणि उकाड्याची सवय होती .

त्याने प्रवास थांबवला आणि गाढवावाराचे ओझे रिकामे केले .प्रवासी गाढवाच्या पडणाऱ्या सावलीत आरामात बसला .त्या परिसरात कुठेच दुसरी सावली नव्हती आणि गाढवाचा मालक प्रवाशाच्या परत निघण्याच्या सूचनेची वाट पाहत होता.

लवकरच गाढवाच्या मालकाला देखील उन्हाचा तडाखा बसू लागला .त्याला असे लक्षात आले की आजूबाजूला कुठच सावली नाही आणि गाढवाची पडणारी सावली फक्त एका माणसाला पुरेल इतकी आहे . तेव्हा तो म्हणाला, “चला उठ आता, मी गाढवाचा मालक आहे तेव्हा त्याच्या सावलीवर माझा अधिकार आहे आणि आता मला सावली हवी आहे ”.

“पण मी जेव्हा गाढव भाडे तत्वावर घेतले तेव्हा मी त्याची सावली सुद्धा घेतलीच आहे ”!प्रवासी वैतागून म्हणाला“ .नाही, तुला सावली मिळणार नाही, तसे आपले ठरलेले नाही,” असे म्हणून गाढवाच्या मालकाने त्याला हाकलण्यास सुरुवात केली.

लवकरच दोघेही एकमेकाला धक्का-बुक्की, ओढा-ओढी करू लागले आणि थोड्याच वेळात मारामारी सुरु झाली.

आणि हे सर्व घडत असतानाच, ते गाढव फिरत फिरत निघून गेल्याचे त्यांच्या लक्षातच आले नाही .

शेवटी जेव्हा ते भांडून-भांडून थकले तेव्हा त्यांच्यासाठी सावली आणि गाढव दोन्हीही नव्हते .

## विचार करण्यासाठी काही प्रश्न:

1. दोघांचे भांडण का सुरु झाले होते?
2. तुम्हाला कोणाचे म्हणणे योग्य वाटते? का?
3. प्रवाश्याला असे का वाटले कि गाढवाच्या सावलीवर त्याचा अधिकार आहे?
4. सावली म्हणजे काय?
5. सावलीची मालकी कोणाला मिळू शकते का? का किंवा का नाही?
6. नक्की वाद कशाबद्दल आहे?
7. ह्या वादाला दुसरा पर्याय होता का?
8. अशा प्रसंगात तुम्ही कसे वागला असता? का?
9. लोक वस्तू / विचार / माहिती का वाटून घेतात, सांगतात? कारण काय? आणि त्यासाठी पुरावा काय?
10. लोक वस्तू / विचार / माहिती का सांगत नाहीत किंवा वाटत नाहीत) स्वतःपुरते मर्यादित ठेवतात (पुरावा देऊन सांगा.

## आठवड्यासाठीचा विचार

या आठवड्यात याकडे बघा की, आपण एखादी गोष्ट वाटून घेतो का?, कि तुम्ही स्वतःपुरताच विचार करता ? त्यावेळेला तुम्हाला काय वाटतं ? केंव्हा तुम्हाला एखादी गोष्ट वाटून घ्यावीशी वाटते आणि केंव्हा नाही?